# प्रकरण तीन

## भविष्य निर्वाह निधी

**3.959 भविष्य निर्वाह निधीच्या शिल्लक रक्कमेचा कोषागार रकमेशी ताळमेळ घेणेबाबत.**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2014-2015 भविष्य निर्वाह निधी डे बुक दिनांक 31/03/2015 अखेरची शिल्लक रक्कम रुपये 1,75,96,81,527/- इतकी आहे. सदर शिल्लक रक्कमेचा कोषागारातील सदर खात्यातील दिनंक 31/03/2015 अखेरच्या शिल्लक रक्कमेशी ताळमेळ घेणेत आलेला नाही.

**3.960 परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना शासन समतुल्य अनुदान येणे बाकीबाबत.**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक अंनियो-1007/संक्र-1/52/प्रक्र/181/ आस्था-11,दिनांक 12/09/2007 व दिनांक 21/05/2010 अन्वये जिल्हा परिषद कर्मचा-यांसाठी परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेच्या अंमलबजावणीची कार्यपध्दती निश्चित केलेली आहे.

भविष्य निर्वाह निधी विभागाचे सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण दरम्यान एकूण शिक्षक कर्मचारी 1309 व शिक्षकेतर कर्मचारी 787 यांच्या वेतनातून अंशदान वर्गणी रक्कम रुपये 2,77,19,628/- इतकी समतुल्य अनुदान शासनाकडून येणे बाकी आहे.

**3.961 भविष्य निर्वाह निधी रक्कमेवरील प्रलंबित व्याजाबाबत.**

**जिल्हा परिषद जळगांव, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांचे भविष्य निर्वाह निधी खात्यावर दर वर्षी अदा केलेल्या व्याजाची रक्कम शासन व महालेखाकार, मुंबई यांच्याकडुन दर वर्षी समायोजीत करुन कोषागारामार्फत जिल्हा परिषदेचे पीएलए खात्यात सन 2009-2010 ते 2014-2015 पासूनची व्याजाची येणे असलेली एकुण रक्कम रुपये 19,16,60,324/- चे समायोजन करुन जमा केलेली नाही. येणे व्याजाची रक्कम शासनाकडे पाठपुरावा करुन जिल्हा परिषदेचे पीएलए खात्यात जमा करण्यात यावी.

**3.962 भविष्य निर्वाह निधी डे-बुक मधील शिल्लक रक्कमा व कोषागार कार्यालयातील व महालेखाकार मुंबई यांच्या लेख्यांशी ताळमेळ न घेण्याबाबत.**

**जिल्हा परिषद जळगांव, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8) -** महाराष्ट्र कोषागार नियम 1968 चे नियम 528 मधील तरतुदीनुसार तसेच महाराष्ट्र शासन वित्त विभाग परिपत्रक क्रमांक संकीर्ण 1008/प्रक्र68/कोषा प्र.5,दिनांक 30/03/2009 नुसार डे-बुक मधील दिनांक 30/03/2015 अखेरची शिल्लक रकमेचा कोषागार व महालेखाकार मुंबई यांचे लेख्याशी (8336 नागरी ठेवी जि.प भविष्य निर्वाह निधी) ताळमेळ न घेतल्याने जिल्हा परिषद डे-बुकात व कोषागार लेख्यात रुपये 1,61,78,52,219/- चा फरक दिसून येतो लेखा संहीता 1968 चे नियम 223 व 224 नुसार नमुना नंबर 87 छापिल व हस्तलिखीत ठेवण्यात आलेली नाही.

**3.963 बृहत पत्रक व रोजकीर्द यामधील तफावतीबाबत.**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 9) -** भविष्य निर्वाह निधी शिल्लकेचा मा.महालेखापाल यांचे कडील शिल्लकेशी, बृहतपत्रक व रोजकीर्द यांच्यातील तफावतीचा मेळ न घेतल्याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, परिपत्रक क्रमांक संकीर्ण 1008/प्र.क्र.68/कोषा-प्र., दिनांक 05/03/2009 नुसार जिल्हा परिषदेकडील भविष्य निर्वाह निधी खात्यावर आवश्यक असलेली शिल्लक व महालेखाकार यांचे कडे

असलेली शिल्लक यांचा दरवर्षी ताळमेळ घेणे आवश्यक असताना ताळमेळ न घेतल्याने रक्कम रुपये 1,47,13,53,655/- इतक्या रकमेची तफावत दिसून येते.

2) उपरोक्त परिपत्रकातील मुद्दा क्रमांक 1.6 नुसार नियंत्रण अधिकाऱ्यांनी जमा व आहरीत रकमांचा दैनंदिन लेखा ठेवताना त्यांनी महिन्यातून एकदा जिल्हा कोषागार अधिकाऱ्यांकडून लेख्यांशी ताळमेळ घालणे आवश्यक असताना व मुद्दा क्रमांक 7 नुसार नियंत्रण अधिकाऱ्याने त्यांच्या कडील लेखा परीपूर्ण करून कोषागार लेख्यावरून त्याची अचूकता तपासणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

3) प्रत्येक वर्षाच्या अखेरीस लेखे बंद केल्या नंतर आहरण व संवितरण अधिकारी यांनी या ठेवीतील वर्ष अखेरीस असलेली शिल्लक महालेखापालांच्या कार्यालयातील शिल्लकांशी ताळमेळ घेऊन त्यामधील तफावतीच्या रकमांचे निराकरण करण्यासाठी आवश्यक ते प्रस्ताव त्यांनी त्यांच्या प्रशासकीय विभागामार्फत वित्त विभागास सादर करणेचे असताना तशी कार्यवाही केलेली नाही. त्याचप्रमाणे नियंत्रण अधिकाऱ्यांनी प्रतिस्वाक्षरीत केलेले शिल्लकी बरोबर असल्याबाबतचे प्रमाणपत्र नियंत्रण अधिकारी व कोषागार कार्यालय यांना पाठवणे आवश्यक असताना अशा प्रकारचे प्रमाणपत्र पाठविण्यात आलेले नाही.

**3.964 परिभाषित अंशदान निवृत्ती योजना (शिक्षक) लेखे उपलब्ध करुन देणेबाबत.**

**जिल्हा परिषद सातारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** भविष्य निर्वाह निधी, जिल्हा परिषद सातारा कडील परिभाषित निवृत्ती योजना अभिलेख्यांबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक अनियो-1005/128/सेवा-4,दिनांक 31/10/2005 अन्वये 1 नोव्हेंबर 2005 रोजी किंवा त्यानंतर सेवेत नियुक्त होणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांचेसाठी नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती योजना अंमलात आणली आहे. महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक अनियो-1007/प्र.क्र.181/आस्था-11,दिनांक 21/05/2010 अन्वये जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांसाठी सदर योजनेच्या अंमलबजावणीची कार्यवाही नमूद केली आहे. त्यानुसार वर्ग -3 व वर्ग - 4 कर्मचाऱ्यांचे सदर योजनेचे अभिलेखे देखभालीची मुख्य कार्यकारी अधिकारी व मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद यांची जबाबदारी आहे.

तथापि जिल्हा परिषद सातारा अंतर्गत सदर योजना लागु असणाऱ्या शिक्षकांचे नमुना-आर-4, नमुना-आर-5, नमुना-आर-6 हे संबंधित अभिलेखे अर्धसमासपत्र क्रमांक 16 दिनांक 26/07/2016 अन्वये मागणी केले असता सदर लेखे ठेवण्यात आले नाहीत व उपलब्ध करुन देण्यात आले नाहीत.

**3.965 लेजर मधील 2014-2015 ची सुरवातीची शिल्लक व 2013-2014 ची अखेर शिल्लक यातील तफावतीबाबत.**

**जिल्हा परिषद सांगली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** भविष्य निर्वाह निधी चे लेखापरीक्षण सन 2014-2015 करते वेळी लेजर तपासणी करतांना 1) श्री. शिपुरे एस.एल. 2) सौ.पाटील जयश्री आनंदराव व 3) श्रीमती खिलारे हेमलता रावसाहेब यांचे खात्यांमधील सुरवातीची शिल्लकेमध्ये तफावत आढळून आली आहे.

**3.966 भविष्य निर्वाह निधी व परिभाषीत अंशदान निवृत्तीवेतन योजना कर्मचारी हिस्सा वर्गणी विलंबाने जमा केलेने झालेल्या व्याज रक्कमेच्या नुकसानीबाबत.**

**जिल्हा परिषद सांगली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** भविष्य निर्वाह निधी विभागाकडील सन 2014-2015 च्या लेखापरीक्षणात प्राप्त धनादेश नोंदवही (न.नं.11) रोजकिर्द (डे बुक) शी निवड महिन्यातील लेखापरीक्षण केले असता संबंधीत विभाग अधिकारी यांनी भविष्य निर्वाह निधी वर्गणी रक्कम रूपये 1,16,81,343/- वित्त विभागाकडे विलंबाने जमा केली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) भविष्य निर्वाह निधी वर्गणीदारांच्या व परिभाषीत अंशदान निवृत्तीवेतन योजना कर्मचारी हिस्सा वर्गणीच्या रक्कमा हया त्याच महिन्यात कपाती नंतरच्या तारखेस त्यांचे खाती त्वरीत जमा करणे आवश्यक होते.

तथापी वरीलप्रमाणे तपशिलातील रक्कमा या संबंधित विभाग / अधिकारी यांनी कपात रक्कमांचे धनादेश / धनाकर्ष कपातीनंतरच्या दिनांकास वित्त विभाग जिल्हा परिषद सांगली यांचेकडे त्वरीत सादर केलेले नाहीत. वित्त विभाग प्राप्त धनादेश हे स्टेट बँकेत जमा करते व त्यानंतरच कपातीच्या रक्कमा संबंधित खाती जमा होतात. भविष्यनिर्वाह निधी नियम 1966 मधील प्रकरण व व्याज नियम 11 (3) अन्वये वर्गणीदाराने पाठविलेली रक्कम लेखाधिकारी यांना त्या महिन्यातच 5 तारखेपूर्वी मिळाली तर अशी रक्कम ज्या महिन्यात मिळाली ती त्याच महिन्यात पहिली तारीख मानता येईल पण रक्कम जर त्याच महिन्याच्या 5 तारखेस किंवा त्यानंतर मिळाल्यास लगतनंतरच्या महिन्याची पहिली तारीख मानण्यात येईल असे नियमात स्पष्ट नमूद असताना संबंधित विभाग / अधिकारी यांच्या दिरंगाईमुळे (विलंबाने धनादेश) पाठविल्याने सदरच्या रक्कमा खातेदार यांच्या खाती विलंबाने जमा झालेने खातेदारांचे एक, दीड, दोन महिने व्याजाचे नुकसान झाले आहे.

**3.967 लेजर मधील 2014-15 ची सुरवातीची शिल्लक व सन 2013-2014 ची अखेर शिल्लक यातील तफावतीबाबत.**

**जिल्हा परिषद सांगली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** भ.नि.नी चे लेखापरीक्षण सन 2014-2015 करते वेळी लेजर तपासणी करतांना 1) श्री. तेरदाळे सुरेश जयपाल 2) श्री.येलूर महेंद्र नानासाहेब 3) श्री.देसाई सोमनाथ बाळकृष्ण 4) श्रीम.माळवे सुवर्णा नारायण 5) श्री.कोरवी विनायक बाळकृष्ण 6) श्री.चव्हाण अंकुशराव यशवंत 7) श्रीम.पाटील सविता सुर्यकांत 8) श्रीम.कोळी राजाक्का भिमराव 9) श्रीम.हेटकाळे रेखा किशोर व 10) श्री.नाकील एम.जी. यांचे खात्यांमधील सुरवातीची शिल्लकेमध्ये तफावत आढळून आली आहे.

**3.968 सहाव्या वेतन आयोगाच्या थकबाकीच्या रकमा भविष्य निर्वाह निधीत दुबार जमा झाल्याबाबत.**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** वित्त विभाग, जिल्हा परिषद अधिन भविष्य निर्वाह निधी चे सन 2014-15 चे लेखापरीक्षण मध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यांची तपासणी केली असता वेतन देयकातून कपात केलेल्या भविष्य निर्वाह निधीचे शेड्युल प्रमाणे 6 व्या वेतन आयोगाची थकबाकीच्या प्राप्त रकमा कर्मचाऱ्याच्या भविष्य निर्वाह निधी खाती जमा करताना दुबार आहारीत झाल्याचे दिसून आले होते. सबब याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग अधिसूचना दिनांक 22/04/2009 परिच्छेद क्रमांक 15 व वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक-1209/प्र.क्र.69/सेवा-9,दिनांक 29/04/2009 मधील परिच्छेद क्रमांक 14 मध्ये नमूद केल्याप्रमाणे 6 व्या वेतन आयोगाची 1 जानेवारी 2006 ते 31 मार्च 2009 या कालावधीतील थकबाकी 5 समान हप्त्यात सबंधित कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह खाती जमा करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे 1 जानेवारी 2006 ते 31 मार्च 2009 या कालावधीतील थकबाकीचे वर्ष निहाय भविष्य निर्वाह निधीत जमा करावयाचे थकबाकी हप्ते यापूर्वी प्राप्त झाले असल्याने ते संबधित कर्मचाऱ्याच्या भविष्य निर्वाह निधी खाती जमा न करता कर्मचाऱ्यांच्या नावे नवीन सस्पेन्स खाते उघडून त्यावर नियमबाह्य जमा केलेले आहेत.

2) 6 वा वेतन आयोग थकबाकी हप्ते एकदा आहारीत करून कर्मचाऱ्याच्या भविष्य निर्वाह निधी खाती जमा केले असताना दुबार आहारीत करणे ही बाब गंभीर आहे. थकबाकी हप्ते दुबार आहारीत केल्याने भविष्य निर्वाह निधी मध्ये जमा शिक्षक कर्मचाऱ्यांची रक्कम रुपये 11,23,946/- इतकी व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची रक्कम रुपये 1,20,244/- इतकी असून एकूण रक्कम रुपये 12,44,190/- वसुल होणे आवश्यक आहे.

3) अशा दुबार जमा थकबाकी रकमावर व्याज अनुज्ञेय नसताना नियमबाह्य व्याजाची परिगणना केलेली आहे. त्यामध्ये शिक्षक कर्मचारी व्याज रक्कम रुपये 3,59,308/- व शिक्षकेत्तर कर्मचारी व्याज रक्कम रुपये 26,348/- अशी एकूण रक्कम रुपये 3,85,656/- वसुल होणे आवश्यक आहे.

**3.969 नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना अभिलेख मधील उणीवा.**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** जिल्हा परिषद कर्मचारी परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेचे अभिलेख तपासणी केले असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक अनियो-1005/126/सेवा-4,दिनांक 07/07/2007 अन्वये शासनाने 1 नोव्हेंबर 2005 रोजी किंवा त्यानंतर शासन सेवेत नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू केली आहे. त्याप्रमाणे कर्मचाऱ्यांची 50 टक्के सममूल्य अंशदान रक्कम वर्गणी वसूल करून सदर शासन निधी खाती जमा करणे आवश्यक आहे व तितकीच रक्कम जिल्हा परिषद हिस्सा रक्कम प्राप्त शासन अनुदानातून सदर निधीखाती जमा करणे आवश्यक आहे. सबब 2010-2011 ते 2014-2015 या कालावधीत कर्मचारी अंशदान वर्गणी रक्कम रुपये 85,662,487/- इतकी जमा झाली असताना शासन हिस्स्याची सममूल्य अंशदान रक्कम रुपये 9,31,49,935/- इतकी समायोजित केल्याने शासन अनुदानाची रक्कम रुपये 74,87,448/- इतकी जादा समायोजित केली आहे. त्यामुळे शासनाची रक्कम रुपये 74,87,448/- नाहक अडकून पडली आहे.

2) योजनेंतर्गत कर्मचाऱ्याकडून वसूल केलेले निवृत्ती वेतन अंशदान रकमेची दैनिक नोंदवही नमुना आर-4 प्रमाणे सन 2010-2011 ते 2014-2015 अखेर जमा रक्कम व प्रत्यक्ष जमा रक्कम यामध्ये रक्कम रुपये 2,62,401/- इतकी तफावत आहे. तफावत रकमेचा मेळ घेण्यात आलेला नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 49 प्रमाणे अंशदान वर्गणीचे धनादेश तात्काळ बँक खाती भरणा करणे आवश्यक असताना कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कपात परिभाषित अंशदान निवृतीवेतन योजनेची मासिक वर्गणीचे जिल्हा परिषद वित्त विभागास रक्कम रुपये 58,95,910/- इतक्या रकमेचे धनादेश शासन खाती विलंबाने जमा केले आहेत.

4) परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना निधीची दैनिक पुस्तक प्रमाणे वर्षअखेर शिल्लक व शासकीय कर्मचारी परिभाषित अंशदान निवृतीवेतन योजना या लेखाशीर्षाखाली कोषागार खाती शिल्लक रक्कम याचा मेळ घेण्यात आलेला नाही.

5) कर्मचाऱ्यांच्या वेतन देयकातून दरमहा जमा झालेल्या अंशदानाची रक्कम व जिल्हा परिषदेने जमा केलेल्या सममूल्य अंशदानाची रक्कम शासन खाती कोषागारात जमा करणेची असून त्याचा मासिक मेळ घेतला जात नाही.

6) ग्राम विकास विभागाच्या शासन निर्णयात सूचित केल्याप्रमाणे मुख्य लेखा व वित्त अधिकाऱ्यांनी जिल्हा परिषदेच्या सदर योजना लागू असलेल्या कर्मचाऱ्यास निवृत्ती लेखाक्रमांक देणे आवश्यक आहे. सबब लेखाक्रमांक दिलेल्या कर्मचाऱ्यांचा तपशील नोंदवहीत एकत्रित बांधणी करून जतन केलेला नाही.

**3.970 भविष्य निर्वाह निधी बृहत पत्रकाचा एकत्रित गोषवारा सन 2013-2014 व सन 2014-2015 चा एकत्रित गोषवारा यांतील अखेर शिल्लक व सुरुवातीची शिल्लक, तफावतीबाबत.**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 1) -** सन 2013-2014 ची अखेरची शिल्लक रक्कम रुपये 101,72,08,162/- इतकी असून सन 2014-2015 मध्ये सुरुवातीची शिल्लक रक्कम रुपये 104,59,12,444/- इतकी नमूद केली आहे. दोन्ही रकमेतील तफावत रक्कम रुपये 2,87,04,282/- इतकी आहे.

तसेच दिनांक 31/03/2015 ची अखेरची शिल्लक रक्कम रुपये 118,93,58,696/- इतकी असणे आवश्यक असताना रक्कम रुपये 113,46,16,920/- इतकी रक्कम अखेरची शिल्लक दर्शवलेली आहे. तफावत रक्कम रुपये 5,47,41,776/- इतकी आहे. याबाबत ताळमेळ घेण्यात आलेला नाही.

**3.971 शिक्षण विभाग मोहोळ 6 व्या वेतन आयोग वेतन फरकातील 5 व्या हप्त्याची रक्कम भविष्य निर्वाह निधी मध्ये जादा दर्शविलेबाबत.**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम 2009 वेतननिश्चिती संबंधी सुचना दिनांक 29 एप्रिल 2009 मधील नियम 15.1 नुसार दिनांक 01/01/2006 ते दिनांक 31/03/2009 पर्यंतच्या कालावधीतील थकबाकी शासन निर्णय दिनांक 06/10/2008 अन्वये मंजूर केलेल्या अग्रीमाची रक्कम समायोजित करुन पुढील 5 वर्षात 5 समान हप्त्यात संबंधित शासकीय कर्मचा-याच्या भविष्य निर्वाह निधी खाती जमा करणेची आहे. परंतु शिक्षण विभाग, पंचायत समिती मोहोळ यांनी शिक्षकांच्या 6 व्या वेतन आयोग वेतन फरकातील 5 व्या हप्त्याची रक्कम रुपये 72,602/- भविष्य निर्वाह निधी मध्ये नियमबाहयपणे जादा दर्शविली आहे.

**3.972 वैयक्तिक खाते अपुर्ण असतांना मोठया प्रमाणात परतावा व नापरतावा अग्रिम नियमबाहय मंजुर करणेबाबत. (शासकीय निधी)**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** संबधित विभागाने महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती 1968 चे नियम 229 नुसार वर्गणीदाराचा भनिनि खात्याचा स्वतंत्र हिशेब ठेवलेला नाही. सन 2014-2015 मध्ये कर्मचाऱ्यांचे वैयक्तिक खाते अपुर्ण असतांना मोठया प्रमाणात परतावा व नापरतावा अग्रिम देण्यात आलेला आढळून येतो. नियम 231(3) व 237 अन्वये नमुना 79 नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. सदर नोंदवही अभावी वर्गणीदाराने आर्थिक वर्षात किती अग्रिम काढला त्याचे समायोजन व शिल्लक याची पडताळणी करता आली नाही. वैयक्तीक खाते नमुना 88 ची पडताळणी केली असता सदर खाते अपुर्ण असुनसुध्दा वर्गणीदारांना नियमबाहयपणे परतावा व नापरतावा अग्रिम मंजुर केलेला आढळून येतो.

**3.973 ठेव सलग्न विमा योजने अंतर्गत मयत कर्मचाऱ्यांचे वारसदारांना विलंबाने रकमा प्रदान करणेबाबत. (शासकीय निधी)**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8) -** सन 2014-2015 या आर्थिक वर्षात ठेव सलग्न विमा योजने अंतर्गत लाभ प्रदान केलेल्या प्रकरणांची तपासणी केली असता साधारणत: 2 ते 3 वर्ष विलंबाने लाभ देण्यात आलेला आहे. त्यामुळे महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक पीएएस 1775/144/75, दिनांक 31 मार्च 1975 नुसार योजनेचा हेतू साध्य झाला नाही.

**3.974 इतर ठिकाणी शासनाचे सेवेत गेलेल्या कर्मचा-यांची भविष्य निर्वाह निधी मधील रक्कम ट्रान्सफर न करणेबाबत.**

**जिल्हा परिषद अकोला, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** इतर ठिकाणी गेलेल्या कर्मचाऱ्यांची भविष्य निर्वाह निधी मधील रक्कम ट्रान्सफर न केल्याचे आढळते याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषद व पंचायत समिती कर्मचारी शिक्षकांची सेवा नगरपरिषदेला स्थलांतर झाली असल्यामुळे त्यांचे भविष्य निर्वाह निधी खात्यातील शिल्लक रकमा नगर परिषद कार्यालयाला अथवा संबधित विभागाला खाते क्रमांकासह कळवून संबधित कर्मचा-यांच्या खात्याला ट्रान्सफर केल्या नाहीत.

2) मंगला देशमुख यांनी दिनांक 31/10/2013 रोजी स्वेच्छा निवृत्ती घेतली परंतू व्याजाची गणणा माहे आक्टोबर, 2012 पर्यंत करण्यात आली.

**3.975 पंचायत समिती विवरणपत्रानुसार कपात करूनही रक्कम भविष्य निर्वाह निधी खाती जमा न झाल्याने झालेल्या कमी प्रदानाबाबत.**

**जिल्हा परिषद अकोला, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** पंचायत समिती विवरणपत्रानुसार कपात करूनही रक्कम भविष्य निर्वाह खाती जमा न झाल्याने कमी प्रदान झाल्याचे आढळते याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समिती मुर्तीजापूर बृहतपत्रिकांत श्री. एस. डी. राऊत आरोग्य सेवक दिनांक 31/08/2014 ला सेवानिवृत्त झाले असून त्यांची माहे जुलै पर्यंत रुपये 3,000/- प्रमाणे रुपये 12,000/- कमी प्रदान संबधीताच्या खाती जमा करणेत आले. परंतु एप्रिल मे जून व जुलै या चार महिन्यांची कपात भविष्य निर्वाह निधी नमुना क्रमांक 88 च्या पडताळणी वरून त्यांच्या खात्यात जमा करण्यात आलेली नाही. त्यामुळे सदर चार महिन्यांची रुपये 3,000/- प्रमाणे रूपये 12,000/- खात्यात जमा करून अनुपालन दर्शवावे. तोपर्यंत सदर रक्कम आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

**3.976 भविष्य निर्वाह निधी योजनेच्या कोषागाराशी व महालेखापाल कार्यालयाशी ताळमेळ न घेणेबाबत.**

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** जिल्हा परीषद यवतमाळ, भविष्य निर्वाह निधी विभागाचे लेखापरीक्षण केले असता, याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

जिल्हा परीषद यवतमाळ, भविष्य निर्वाह निधी योजनेचा कोषागाराशी व महालेखापाल कार्यालयाशी ताळमेळ घेवून प्रत्यक्ष शासन खाती जमा केलेल्या रकमाची पडताळणी करुन योग्य वर्गणीच्या रकमा व व्याजाच्या रकमा कर्मचा-याच्या खाते वहीत नोंदविणे आवश्यक असतांना तसे केले नाही.

**3.977 भविष्य निर्वाह निधी मासीक वर्गणीचा उशिरा भरणा झाल्याने खातेदारास देय असलेल्या व्याजाच्या नुकसानीबाबत.**

**जिल्हा परिषद बुलडाणा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 14) -** महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम 1998 चे नियम 12 पोट नियम 9 नुसार वर्गणीदाराचे पंचायत समितीनी अग्रेषीत केलेल्या रकमांचे बाबतीत त्या महिन्यांचे 5 तारखेच्या आत व लगत नंतरच्या महिन्याच्या पहिला दिवस ठेवीच्या दिनांक समजण्यात येतो. परंतु पंचायत समिती स्तरावर देयकातून वजाती केलेल्या रकमा उपकोषागारात विलंबाने भरल्या जातात तसेच भरणा केलेल्या चलान वरिष्ठ लेखाधिकारी भविष्य निर्वाह निधी वित्त विभाग जिल्हा परिषद बुलडाणा यांना विलंबाने सादर केल्या जातात त्यामुळे ठेवीचा महिना व्याज निर्धारण करणे यात अडचणी निर्माण होवुन भविष्य निर्वाह निधी खातेदारास कमी व्याज मिळते.

**3.978 भविष्य निर्वाह निधी मध्ये एकच हप्ते पुन्हा पुन्हा त्याच खात्यावर जमा करणेबाबत.**

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 1) -** भविष्य निर्वाह निधी, जिल्हा परिषद, वर्धा येथील सन 2014-2015 शासन परिपत्रक क्रमांक वेपूर-1209/प्र.क्र. 69/सेवा 9 दिनांक 29/04/2009 मधील अनुक्रमांक 14 नियम क्रमांक 15 अन्वये 5 वर्षात 5 समान हप्त्यात शासकीय कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा करावयाच्या आहे. 15.3 या नियमानुसार आहरण व संवितरण अधिका-याने थकबाकी दर वर्षी जून महिन्यात जमा करावी. असे शासन निर्णय नमूद करण्यात आले आहे. तसेच थकबाकी हप्ता प्रदान करतांना त्याची नोंद सेवापुस्तकात घेणे आवश्यक आहे. मा. मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी जिल्हा परिषद, वर्धा यांचे पत्र क्रमांक 831/2015 दिनांक 21/10/2015 अन्वये खालील कर्मचा-यांचे एकाच खात्यात एकच हप्ते पुन्हा पुन्हा जमा केल्याबाबत संबंधित सर्व विभाग प्रमुखांना कळविण्यात आले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कर्मचा-यांची जादा हप्ते रक्कम रुपये 13,85,275/- वसूल करुन योग्य निधीत जमा होणे आवश्यक आहे.

2) कर्मचा-यांचे सेवापुस्तकात नोंदी घेऊन त्याप्रमाणे हप्ते काढणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही न केल्याने वरील प्रमाणे अनियमितता झालेली आहे.

3) चौकशीअंती जादा प्रदान झाल्यास वसूलीची कार्यवाही होणे आवश्यक आहे.

**3.979 आधीच्या वर्षाची भविष्य निर्वाह निधीची विवरण चिठ्ठी नसतांना नापरतावा अग्रीम नियमबाहयपणे मंजूर करण्याची अनियमितता.**

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** भविष्य निर्वाह निधी, जिल्हा परिषद, वर्धा येथील सन 2014- 2015 या वित्तीय वर्षामध्ये विविध विभागात कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना ना परतावा भविष्य निर्वाह निधी अग्रीम देण्यात आला. सदर अग्रीम देतांना त्यांचे भविष्य निर्वाह निधी खात्यातून दिलेली रक्कम वजा करण्यात आली किंवा नाही याची पडताळणी लेखापरीक्षणाचे वेळी करता आली नाही. तसेच कार्यालयीन नस्तीला सर्व आवश्यक दस्तऐवज आढळून आले नाही. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) लेखापरिक्षणास प्राप्त अभिलेख्यामध्ये कर्मचा-यांची अग्रीम घेण्याच्या अगोदरच्या वर्षाची संगणक जमा चिठ्ठी दिसून आली नाही. त्यामुळे ना परतावा रक्कमेची परिगणना करतांना सुरुवातीची रक्कम कशाच्या आधारे ठरविण्यात आली. तरी याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे. तसेच लेखाधिकारी यांनी सन 2011-2012 व सन 2012-2013 चे जमा रक्कमांच्या आधारे पडताळणी करुन देयक पारीत केले आहे. नियमानुसार संबंधित कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधी बाबत ज्या दिनांकास अर्ज प्राप्त झालेत त्या दिनांकास शिल्लक रकमेवर नियमानुसार अग्रिम प्रदान करणे आवश्यक असतांनी नियमबाहयपणे अग्रिम मंजूर प्रदान केले आहे.

2) ज्या कारणासाठी ना परतावा अग्रिम देण्यात आला त्याची प्रती कार्यालयीन प्रतीला आढळून आल्या नाहीत. तसेच जिल्हा परिषद यांनी लेखा संहिता प्रमाणे विहीत नमुने वापर करणे आवश्यक असतांनी तशी कार्यवाही केलेली नाही. भविष्य निर्वाह निधी अधिनियम 1966 मधील नियम क्रमांक 26 चे पालन झाले किंवा कसे याची पडताळणी करता आली नाही. तसेच संबंधितांनी उचल रकमेच्या दुरुपयोग केल्याची शक्यता नाकारता येत नाही. नियमाप्रमाणे कार्यवाही होणे आवश्यक आहे.

3) संबंधित खातेदारांना अग्रिम प्रदान केल्यानंतर त्या नापरतावा अग्रिमाचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असतांना तसे प्रमाणपत्र आढळून आले नाही. सबब विभागाने ना परतावा अग्रिम रकमेचे प्रदान करतांना भविष्य निर्वाह निधी नियमाचे पालन उचितरित्या केल्याचे दिसून आले नाही.

4) भविष्य निर्वाह निधी आदेशा मध्ये अर्ज केव्हा केला याचा उल्लेख नाही. लग्नाआधी दोन अग्रिम देणेबाबत तरतुद आहे. पण लग्नाची तारीख नमुद नाही. त्यामुळे वेळेवर अग्रीम प्रदान झाले किवा नाही याची खात्री करता आली नाही. घरदुरुस्ती, बाबत अभिलेखे नाही.

5) सदर लेखापरीक्षण हे निवड महीन्याचे असल्याने इतर देयकात ही वरील प्रमाणे अनियमतता राहु शकते चौकशीअंती कार्यवाही होणे आवश्यक आहे.

**3.980 नमुना आर 4 मधील नोंदी आर 7 मध्ये उपलब्ध न होणेबाबत.**

**जिल्हा परिषद भंडारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 1) -** जिल्हा परीषद भंडाराचे वित्त विभागाचे नमुना 4 मधील चलान दिनांक 09/10/2014 ची रक्कम रुपये 4,646/- आर 7 नोंदवहीत दर्शविण्यात आलेली नाही. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) नमुना आर 4 व 7 मधील कर्मचाऱ्यांचे अंशदानाच्या रकमांचे बँकेला सादर केलेले चालानाशी रेखाकंन करीता असता पुढील रकमांचे चालानाची नोंद नमुना आर 7 मध्ये लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही. दिनांक 09/10/2014 C.D.P.O साकोली रुपये 4,646/- सदर चालानाची रक्कम नमुना आर 7 मध्ये घेतल्याची नोंद लेखापरीक्षणास उपलब्ध् झाली नाही. त्याकरीता अर्धसमास पत्र क्रमांक 4 दिनांक 18/06/2016 अन्वये विचारणा केली असता विभागाने खुलासा सादर केला की, बालविकास प्रकल्प् अधिकारी साकोली यांनी रुपये 4,646/-दिनांक 09/10/2014 रोजी रक्कम बँकेत भरणा केली परंतु आर 7 मध्ये अनावधानाने सदर रक्कम सुटलेली आहे.

**3.981 अशंदान निवृत्ती योजनेचे लेखे न ठेवणेबाबत.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 1)** - लेखापरीक्षण वर्ष सन 2014-2015 मध्ये शासन निर्णय क्रमांक 181 दिनांक 21 मे 2010 मधील अनुक्रमांक 7 ते 32 प्रमाणे अभिलेखे परिरक्षीत परिपुर्ण नाहीत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक अनियो-1007/प्र.क्र.181/आस्था 11 दिनांक 21 मे 2010 मधील अनुक्रमांक 7 ते 32 प्रमाणे अभिलेखे परिरक्षीत परिपुर्ण नाहीत. जिल्हा परिषद अंतर्गत दिनांक 01/11/2015 नंतर कर्मचा-यांचे परिभाषीत अंशदान शिक्षक व ग्रामसेवक व इतर कर्मचा-यांचे खाते असल्याचे तोंडी सांगितले व त्यानुषंगाने वसुली केलेली आहे. महाराष्ट्र शासन,वित्त विभाग क्रमांक डिसीपीएस/1007/18/सेवा-4 शासन निर्णय दिनांक 07/07/2007 अन्वये परिच्छेद 8 प्रमाणे विहीत नमुना फार्म अपुर्ण आहे.

2) सन 2005-2006 ते 2010-2011 कर्मचा-यांचा वर्षनिहाय जमा वर्गणी वसुली रक्कम व शासन हिस्सा रक्कम व्याज इत्यादी लेखे व त्याचे वार्षीक विवरण लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

3) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक अनियो-1009/प्र.क्र.1/सेवा 4/दिनांक 12/11/2010 नुसार कार्यवाही केलेली नाही.

4) सहावा वेतन आयोग थकबाकी स्तर दोन मध्ये जमा कार्यपध्दतीनुसार कार्यवाही नाही.

5) कर्मचा-याचे अंशदान ताळमेळ अंदाजपत्रक सादर केलेली नाही.

6) पंचायत समिती अर्जुनी मोरगाव अंशदान निवृत्ती वेतन योजनेचे नमुना नंबर आर 5 व आर 6 मध्ये नोंदी घेण्यात आलेल्या नाही.

**3.982 श्री.जी.एन.सोनुले, अधिव्याख्याता, जिल्हा परिषद हायस्कुल, भद्रावती यांना केलेल्या अंतिम शोधनाबाबत.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 11) -** श्री जी.एन.सोनुले, अधिव्याख्याता, जिल्हा परिषद हायस्कुल, भद्रावती यांना 501/- दिनांक 29/10/2014 प्रमाणकान्वये अंतिम देयकाचे रक्कम रुपये 6,48,708/- चे प्रदान करण्यात आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सन 2014-15 चे नमुना 88 मध्ये सुरु शिल्लकेमध्ये उपरिलेखन करुन शिल्लक वाढविण्यात आलेली आहे. सेवानिवृत्तीचे दिनांकापर्यंत वर्गणी कपात करण्यात आलेली आहे.

2) सन 2013-14 चे नमुना 88 मध्ये उपरिलेखन करुन व्याजाचे रक्कमेत वाढ करण्यात आलेली असुन 5 वे वेतन आयोगाच्या रकमेवर एकंदरीत एकुण रक्कमेत जमा करुन व्याजाची गणना केलेली आहे. 5 व्या वेतन आयोगाचे रक्कमेवर स्वतंत्र व्याजसुध्दा देण्यात आल्याचे दिसुन येते. म्हणजेच एकाच रकमेवर दोनवेळा व्याजाची गणना केल्याचे दिसुन येते. त्यामुळे त्यांना जादा व्याज शोधन केल्याचे दिसुन येते.

**3.983 भविष्य निर्वाह निधीचे सन 2013-14 चे वैयक्तीक खाते अपुर्ण असतांना सन 2014-15 मध्ये नापरतावा अग्रीम मंजुरीबाबत.**

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 1) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषद औरंगाबाद भविष्य निर्वाह निधी विभागाचे सन 2014-2015 चे लेखा परीक्षणात भविष्य निर्वाह निधी नमुना नंबर 88 खाते नोंदवहीत सन 2013-2014 चे खाते अपुर्ण असतांना सन 2014-2015 मध्ये नापरतावा अग्रीम मंजुरी प्रदान करुन संबंधितास रक्कम अदा केली आहे.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम 1998 चे नियम 12 मधील तरतुदी नुसार वित्तीय वर्षअखेर कर्मचा-यांच्या खाती शिल्लक असलेल्या रकमेवर व्याजाची आकारणी करुन नियम 36 (1) नुसार कर्मचा-यांना मार्च अखेर खात्यात सुरुवातीची शिल्लक वर्षातील जमा व वर्षातील उचल अधिक व्याज व अखेरची शिल्लक असलेले विवरणपत्र देण्यात येईल. नियम 36 (2) नुसार कर्मचा-याने सदर विवरणपत्र प्राप्त झाल्यापासुन तीन महिन्याचे आत विवरण पत्रातील शिल्लक रक्कम अचुक असल्याबाबत खात्री करणे आवश्यक

आहे. तसेच वैयक्तीक खात्यावर वित्त विभागाचे उपलेखापाल, लेखाधिकारी, वरिष्ठ लेखाधिकारी यांनी स्वाक्षरी केलेली नाही. त्यामुळे वैयक्तीक खात्यातील नोंदी अचुक असल्याची खात्री करता आलेली नाही.

**3.984 मुख्य लेखाशिर्ष 8336 नागरी ठेवी भविष्य निर्वाह निधीचा कोषागाराशी ताळमेळ घेणेबाबत.**

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग शासन परिपत्रक दिनांक 31/03/2009 नुसार मुख लेखा शिर्ष 8336 नागरी ठेवी भविष्य निर्वाह निधी महालेखापाल नागपुर यांनी दिनांक 01/04/2009 रोजीची सुरवातीची शिल्लक रक्कम रुपये 97,10,37,731/- आधारभुत समजुन प्रमाणित केलेली आहे. त्यानुसार लेखाशिर्ष 8336 अंतर्गत जिल्हा परिषदेने दिनांक 31/03/2015 अखेरची शिल्लक कोषागार व महालेखापाल यांचेकडील लेख्याशी ताळमेळा प्रमाणे रक्कम रुपये 2,78,51,33,213/- इतकी आहे. दिनांक 31/03/2015 अखेर इतकीच रक्कम जिल्हा परिषदेकडून भविष्य निर्वाह निधी खातेदारांना देणे असल्याबाबतचा तपशील दर्शविला नाही, तसेच डेबुक अदयावत नसल्याने शिल्लक रकमेबाबत खात्री करता आलेली नाही.

**3.985 भविष्य निर्वाह निधी वरिल थकीत व्याज संयोजनाबाबत.**

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

जिल्हा परिषद औरंगाबाद भविष्य निर्वाह निधी विभागाने सन 2014-2015 या वित्तीय वर्षापर्यंतचे भविष्य निर्वाह निधी शिल्लक रकमेवरील थकीत व्याज शासनाकडून उपलब्ध करून संमायोजन केलेले नाही. सन 2014-2015 अखेर शासनाकडून व्याजापोटी रक्कम रुपये 21,75,06,191/- भविष्य निर्वाह निधीवरील थकीत व्याजाचा निधी येणे प्रलंबित आहे. करिता, भविष्य निर्वाह निधीवरील थकीत व्याजाचा निधी प्राप्त करण्याची कार्यवाही होणे आवश्यक आहे.

**3.986 नमुना नंबर 88, 89, 79 लेखापरिक्षणास उपलब्ध न केलेबाबत.**

**जिल्हा परिषद बीड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 1) -** भविष्य निर्वाह निधी विभाग, जिल्हा परिषद बीड यांनी भविष्य निर्वाह निधीच्या लेखांकनासाठी नमुना नंबर 88, 89, 79 ठेवणे आवश्यक आहे, परंतु सदर नमुने लेखापरिक्षणास उपलब्ध करुन दिलेले नाहीत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) नमुना नंबर 88 खातेवही (Ledger):- महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखासंहिता 1968 चे नियम 233 नुसार नमुना 88 खाते नोंदवही एकुण कर्मचारीनिहाय न ठेवता वर्षनिहाय ठेवलेली आहे. त्यामुळे नमुना 88 खाते नोंदवही कर्मचारी निहाय न ठेवल्याने परतावा अग्रिम व प्रमाणकांची तपासणी लेखापरीक्षणास करता आलेली नाही. त्यामुळे सदर कर्मचाऱ्यांची परतावा वसुली कधी सुरु झाली, किती हप्ते वसुली करण्यात आली व त्यांचे शिल्लक रकमांची तपासणी करता येत नाही.

2) नमुना नंबर 89 बृहतपत्रक (Broadsheet):- महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखासंहिता 1968 चे नियम 234 नुसार नमुना नंबर 89 सन 2001-2002 पासुन बृहतपत्रक तयार केलेले नसल्यामुळे व्याजाची गणना कशाचे आधारे केली. तसेच कर्मचारी निहाय व महिनानिहाय जमा नोंदी तसेच त्यावरील व्याजाची गणना योग्य बाबतची पडताळणी करता आली नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या लेखासंहिता 1968 चे नियम 237 नुसार भविष्य निर्वाह निधीतुन दिलेल्या आगाऊ रकमांची नोंद करण्यासाठी नमुना 79 मध्ये वित्त विभागाने ही नोंदवही ठेवलेली नाही त्यामुळे दिलेल्या आगाऊ रकमा व त्याची परतफेड याची पडताळणी करता आली नाही.

**3.987 ठेव संलग्न विमा अनुदानाबाबत.**

**जिल्हा परिषद बीड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 9) -** भविष्य निर्वाह निधी विभाग, जिल्हा परिषद बीड, जिल्हा बीड यांनी सन 2014-2015 मध्ये ठेव संलग्न विमा योजनेवर रुपये 1,72,470/- इतका खर्च नोंदवलेला आहे, याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ठेव संलग्न विमा प्रकरणांचे देयकाची नोंदवही नमुना नंबर 12 मध्ये सन 2014-2015 करिता जिल्हा परिषदेचे स्वउत्पन्नाच्या अंदाजपत्रकीय तरतुद रुपये 1,00,000/- करण्यात आली आहे. परंतु प्रत्यक्षात सन 2014-2015 मध्ये ठेव संलग्न विम्यांची एकुण 04 प्रकरणे प्राप्त झाली असुन त्यांची रक्कम रुपये 1,72,470/- होते. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, परिपत्रक क्रमांक पीएफआर/1080/ 174सीआर-2/813/11 दिनांक 26/12/1980 नुसार मृत कर्मचा-यांच्या कुटुंबियास प्रथमत: जिल्हा निधीतुन अदा करण्याच्या सुचना आहेत. तद्नंतर सदरील रकमेची प्रतिपुर्ती शासनाकडुन करावेत असे आदेश आहेत. आयुक्तांनी ही माहिती एकत्रित करुन शासनास पाठविणे आवश्यक आहे.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक बीजीटी-2014/प्रक्र.60/वित्त-1 दिनांक 24/02/2015 अन्वये ठेव संलग्न विमा योजनेकरिता विभागास एकुण रुपये 10,33,000/- अनुदान उपलब्ध करण्यात आले. त्यानुसार सन 2014-2015 मध्ये ठेव संलग्न विमा प्रकरणांची रक्कम रुपये 1,72,470/- होत असुन उर्वरीत रक्कम रुपये प्राप्त अनुदानातील शिल्लक रक्कम रुपये 8,60,530/- केव्हाची आहे, सदर रकमेची मागनी कोणत्या प्रकरणासाठी केली, सदर रक्कम यापुर्वी अदा केली किंवा कसे याबाबतचा तपशिल लेखापरिक्षणास उपलब्ध केलेला नाही.

**3.988 एकाच बाबीसाठी दोनदा नापरतावा अग्रिम रक्कम प्रदान करणेबाबत.**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 1) -** जिल्हा परिषद, हिंगोली भविष्य निर्वाह निधी विभागाचे सन 2014-2015 चे लेखापरीक्षणात एकाच बाबीसाठी म्हणजेच प्लॉट खरेदीकरीता ना-परतावा अग्रिम प्रदान करण्यात आले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) भविष्य निर्वाह निधीच्या रकमेतून महाराष्ट्र भविष्य निर्वाह निधी नियम 16(ग) टीप क्रमांक 4 नुसार एकाच प्रयोजनासाठी एकदाच रक्कम प्रदान करणे आवश्यक असताना श्री. एच.डी. सवाईराम, सहशिक्षक यांनी प्लॉट खरेदीसाठी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी त्यांचे आदेश क्रमांक 1591/12, दिनांक 08/05/2012 अन्वये रक्कम रुपये 2,63,000/- व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी त्यांचे आदेश क्रमांक 305/2014 दिनांक 13/05/2014 अन्वये रुपये 3,75,000/- एवढे ना परतावा अग्रिम मंजुर करुन प्रदान करण्यात आले. सदर रक्कम एकाच प्रयोजनासाठी दोन वेळेस काढण्यात आली असल्याने सदर रकमेची वसूली होणे आवश्यक आहे.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, 1968 चे नियम 37(1) नुसार कार्यवाही करण्यात आले नाही.

**3.989 कपात अनुसुचीनुसार भविष्य निर्वाह निधी ची कपात रक्कम बृहतपत्रकात जादा जमा घेणेबाबत.**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** भविष्य निर्वाह निधी विभाग, जिल्हा परिषद हिंगोलीचे सन 2014-15 चे लेखा परीक्षणात बृहतपत्रक व खाते नोंदवही याची तपासणी केली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कपात तक्त्यानुसार भविष्य निर्वाह निधी कपातीच्या रक्कमा रूपये 24,620/- बृहतपत्रक नमना नंबर 89 वर मुळ परिच्छेदात नमुद केल्याप्रमाणे जादा जमा घेण्यात आलेल्या असल्याचे आढळून आले. जादा रक्कमा वसुल करणे आवश्यक आहे.

**3.990 जिल्हा परीषदेचे स्वउत्पन्नातून निर्माण केलेल्या कर्मचारी यांचे भविष्य निर्वाह निधीचे लेखे वेगळे न ठेवलेबाबत.**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8) -** भविष्य निर्वाह निधी, जिल्हा परिषद, हिंगोली चे सन 2014-15 चे लेखापरीक्षणात जिल्हा परिषद स्वउत्पन्नातून निर्माण केलेले उदा. हातपंप कर्मचारी अंतर्गत कर्मचाऱ्यांचे भविष्य निर्वाह निधीचे अभिलेखे तपासले असता त्यांचे वेगळे लेखे ठेवण्यात आलेले नाहीत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा विभाग व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक आपना 3307/प्र.क्र. 26/पा.पु.15,दिनांक 07/04/2008 व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक वेतन-2012/प्र.क्र.109/आस्था10, दिनांक 04/06/2012 अन्वये जिल्हा परिषद स्वउत्पन्नातून निर्माण केलेले उदा. हातपंप कर्मचारी यांचे वेतन, भत्ते व निवृत्ती वेतन याची जबाबदारी जिल्हा परिषद यांची असल्याचे शासन परिपत्रकात व निर्णयात नमुद केलेले असल्यामुळे त्यांचे वेगळे लेखे ठेवणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.

2) विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या माहितीनुसार जिल्हा परीषदेकडे दिनांक 31/03/2015 अखेर एकूण 6433 भविष्य निर्वाह निधीचे खातेदार असुन यामध्ये जिल्हा परिषद स्वउत्पन्नातून वेतन व भत्ते घेणारे कर्मचारी यांची संख्या दर्शविलेली नाही.

3) विभागाने सन 2014-15 चे लेखापरीक्षणात सर्वच कर्मचाऱ्याचे कपातीची रक्कम एकाच खात्यावर जमा करण्यात आली आहे. त्यामधूनच परतावा, ना-परतावा व व्याज इत्यादी दाव्यांची अदाई होत असल्याचे दिसते.

4) जिल्हा परिषद स्वउत्पन्नातून वेतन अदा होणाऱ्या कर्मचारी यांना अंदाजपत्रकामध्ये तरतूद करुन स्वतंत्र खाती उघडून त्यामधून वेतन व भत्ते व सेवा विषयक लाभ अदाई करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही करण्यात आली नाही.

5) या कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र जिल्हा परिषद सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम, 1998 चे नियमान्वये शासकीय योजनेचे वर्गणीदार करता येत नाही. सदर कर्मचाऱ्याचे भविष्य निर्वाह निधी ची वर्गणी शासन खाती जमा केल्याचे आढळते.

6) जिल्हा परिषद स्वउत्पन्नातून वेतन व भत्ते अदाई होणाऱ्या कर्मचाऱ्यांची यादी, त्यांची संख्या, भविष्य निर्वाह निधी खाते क्रमांक, वर्गणी व व्याज याबाबतचे अभिलेखे लेखापरीक्षणात दर्शविण्यात आलेले नाहीत.

**3.991 वेतनातून कपात केलेल्या रक्कमापेक्षा कमी / जास्त रक्कम खात्यावर जमा घेतलेबाबत.**

**जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 1) -** भविष्य निर्वाह निधी, जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2014-2015 च्या लेखापरीक्षणात कर्मचा-यांच्या वेतनामधुन कपात केलेल्या रक्कमांचे विवरणपत्र व बृहतपत्रकाची तपासणी केली असता कपात केलेल्या रक्कमापेक्षा 290 कर्मचाऱ्यांचे खात्यावर कमी / जास्त रक्कम जमा केल्याचे दिसुन आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कर्मचा-यांच्या वेतनातून कपात करण्यात आलेली भविष्य निर्वाह निधी वर्गणी व परतावा रक्कम विवरणपत्रानुसार त्यांचे खाती जमा करणे आवश्यक आहे. परंतू बृहतपत्रक व खतावणी मध्ये जमा रक्कमेची नोंद कमी / जास्त घेण्यात आलेली आहे. तरी बृहतपत्राची तपासणी करून लेखे अचूक करणे / दुरुस्त करणे आवश्यक आहे.

**3.992 कपातीचे विवरणपत्र नसताना बृहतपत्रकात नोंदी घेणेबाबत.**

**जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** भविष्य निर्वाह निधी विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद, सन 2014-2015 च्या लेखापरीक्षणामध्ये कपातीचे विवरणपत्र नसताना भविष्य निर्वाह निधीच्या खात्यावर रक्कम नोंद करण्यात आलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कपातीच्या विवरणपत्रांची व बृहतपत्रकाची तपासणी केली असता 261 कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधी कपातीचे विवरणपत्र नसताना भविष्य निर्वाह निधी खाती रक्कम नोंद केलेली आहे. कपातीचे विवरणपत्रे नसताना त्यांच्या भविष्य निर्वाह निधी खाती नोंदी घेण्यात आलेल्या आहेत.

261 कर्मचारी यांचे कपात विवरणपत्र दर्शविणे आवश्यक आहे.